हॅलो प्रभात

दि. 22/0

# 'विवेकानंद'मध्ये रंगले युवा साहित्य संमेलन

कोल्हापूर : हॅलो प्रभात

नव्या पिढीचे साहित्य विद्यार्थ्यांनी वाचले पाहिजे. मातृभाषेत जेवढे व्यक्त होता येते तेवढे दुसऱ्या भाषेमध्ये व्यक्त होता येत नाही. मातृभाषेच्या विकासासाठी जास्तीत जास्त वाचन व लेखन करणे गरजेचे आहे.

मातृभाषेच्या विकासाचे बाळकडू शैक्षणिक प्रक्रियेमध्ये विकसित होते. विविध छंद जोपासल्याने जीवनात सर्जनशीलतेला व सृजनशीलतेला वाव मिळतो. धावपळीच्या जीवनात आयुष्याला उभं करण्यासाठी माणूस सतत संघर्ष करीत आहे. हा संघर्ष साहित्यातून चित्रित होत असतो. त्यासाठी युवकांच्या साहित्यप्रज्ञेचा शोध घेण्यासाठी आणि नवोदितांच्या सर्जनशीलतेला मुक्त व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी अशा युवा साहित्य संमेलनांची आवश्यकता असते, असे प्रतिपादन प्रसिध्द शिक्षणतज्ज्ञ व लेखक प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले. ते विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ आणि आय. क्यु. ए. सी. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या चौथ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी उदघाटक म्हणून बोलत होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व आय. क्यु. ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनासाठी विद्यार्थी, प्राध्यापक आणि साहित्य रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.